अमृतं तु विद्या
भारतीय विद्या भवन्स,
# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय,
(शासन अनुदानित स्वायत्त संस्था)
मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५८

संदर्भ क्र. 80/2023-24/1368 दिनांक : 24/01/2024.

## परिपत्रक

तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. पत्र क्रमांक : १६/संकीर्ण/मतदान(शपथ)/२०२३-२४/०८, दिनांक १९ जानेवारी २०२४ अन्वये राष्ट्रीय मतदार दिन म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम दिनांक २५ जानेवारी, २०२४ रोजी करण्याबाबत सूचित केलेले आहे.

वरील सुचनेप्रमाणे संस्थेमध्ये दिनांक २५ जानेवारी, २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता मुख्य प्रवेशद्वारावर मतदार दिन म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

मराठी भाषेमध्ये घ्यावयाच्या शपथपत्राचा नमुना खालीलप्रमाणे आहे.

**"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करु आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु."**

विभाग प्रमुख (स्थापत्य, यंत्र, विद्युत आणि प्रथम वर्ष)/प्र.प्रबंधक/ग्रंथपाल/परीक्षा नियंत्रक/पदव्युत्तर विभाग यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर वर्ग यांना सुचित करुन गुरुवार, २५ जानेवारी, २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता मुख्य प्रवेशद्वारावर उपस्थित राहण्याचे कळवावे. तसेच विद्यार्थी यांनी सुध्दा सदरच्या कार्यक्रमास उपस्थित राहावे.

प्र. प्राचार्य

z:\khot shridhar\2024\marathi\ho\circular 25 january national voters day 2024.docx